पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम
काटा रोड,सिव्हील लाईन,वाशिम, ता जि वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२–२३४८३४
ई–मेल sp.washim@mahapolice.gov.in
Website:-www.washimpolice.gov.in

दिनांक.०४/०१/२०२२

****

## पोलीस स्थापना दिनानिमित्त प्रसारमाध्यमांशी संवाद.

मा.पोलीस अधिक्षक श्री.बच्चन सिंह यांचे मार्गदर्शनात पोलीस रेझींग डे निमीत्त प्रसारमाध्यमांशी संवाद साधुन सन २०२१ मध्ये वाशिम जिल्हयात करण्यात आलेल्या कामगिरीचा आढावा घेण्यात आला. त्यात वाशिम जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या वेगवेगळया समाजउपयोगी योजनांची माहिती देऊन गत वर्षात करण्यात आलेल्या कामगिरीची माहिती प्रसारमाध्यमांना देण्यात आली. त्यात खालील मुदयांवर चर्चा करण्यात आली.

गुन्हे आढावा घेताना भाग १ ते ५ च्या गुन्हयात मागील पाच वर्षाच्या तुलनेत ७% टक्यानी वाढ झाली असुन गुन्हे उघडकीचे प्रमाण ८१% , बॉडी ऑफेन्स मध्ये घट झाली तर महिला अत्याचाराच्या गुन्हयात मागील वर्षाच्या तुलनेत घट झाली असुन मालमत्तेच्या गुन्हयात मागील ५ वर्षाच्या तुलनेत वाढ झाली आहे. खुनाच्या गुन्हयात मागील ५ वर्षाच्या तुलनेत घट झाली असुन सन २०२१ मध्ये दाखल २१ खुनाच्या गुन्हयापैकी २१ खुनाचे गुन्हे उघडकीस असुन आरोपी गजाआड असुन गुन्हे न्यायप्रविष्ठ आहेत. दोषसिध्दीच्या प्रमाणात देखील मागील पाच वर्षाच्या तुलनेत वाढ झाली असुन यावर्षीचे प्रमाण ५९% आरोपींना विविध हेडखालील गुन्हयात शिक्षा सुनाविण्यात आल्या आहेत.

**उत्कृष्ट कामगिरी अंतर्गत** स्थानिक गुन्हे शाखेने पोस्टे जऊळका येथील जेष्ठ नागरिकांच्या दुहेरी खुनाची उकल केली तसेच मालेगाव हददीत सापडलेल्या मृतदेहाची जनसंपर्क व गोपनिय माहितीवरुन खुनाचा गुन्हा उघड करुन आरोपी अटक करण्यात यश मिळविले. मालेगाव पोलीस ठाणे येथील ज्वेलरला लुटुन एका कामगाराची हत्या करुन फरार झालेले ५ आरोपी मालेगाव पोलीसांनी ४८ तासात गजा आड केले.

सन २०२१ मध्ये सायबर शाखेने एकुण २४९ मोबाईल ट्रेस करुन २०० मोबाईल फिर्यादीना परत केले आहेत. अवैध धंदे व गुंडाविरुध्द करण्यात आलेली कारवाई :– सन २०२० च्या तुलनेत अवैध्य धंदयावर जास्तीत जास्त कारवाई करुन ५ गुंड प्रवृतीच्या इसमांना तडीपार करण्यात आले आहे.

वाहतुक पोलीसांनी देखील सन २०२० च्या तुलनेत सन २०२१ जास्तीत जास्त दंड वसुल करुन शासनाच्या तिजोरीत जमा करण्यात आला. मा.पोलीस अधिक्षक बच्चनसिंग विना हेल्मेट कारवाईची विशेष मोहिम राबवुन पोलीस अधिकारी/अंमलदार यांना हेल्मेट सक्ती केल्या नंतर मागील ६ महिन्यात विना हेल्मेट असलेल्या इसमांवर कारवाई करुन ३६,६०,४००/– दंड वसुल करुन शासनाचे तिजोरीत भरणा केला.

अंमलीपदार्थ तस्करी :– वाशिम जिल्हयात रिसोड येथुन अंमली पदार्थाची तस्करी होत असल्याची माहिती मिळताच रिसोड पोलीसांनी विदर्भातील सगळयात मोठी कारवाई करुन ११ क्विंटल ५० किलो किंमत ३,६५,००,०००/– (तिन कोटी पासष्ट लाख) मुददेमाल जप्त केला. वाशिम जिल्यामध्ये अवैध धंदयावर कार्यवाही करण्यात आली असुन जुगार एकुण ९६८ केसेस मध्ये ३६,५७०००/– रू चा माल जप्त करण्यात आला आहे. तसेच अवैध दारू बाबत एकुण १९९६ केसेस मध्ये १,२०,३०,०४०/– रू चा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

**CRISP**:-वाशिम जिल्हा येथील गुन्हे अभिलेखावर एकुण १०० निगराणी बदमाश, शरिराविरुध्दचे गुन्हेगार तसेच एका पेक्षा अधिक गुन्हे असलेले एकुण १३१ गुन्हेगार तसेच दिवसा रात्री घरफोडी करणारे,मोटार सायकल चोरी करणाऱ्या गुन्हेगारावर नियंत्रण ठेवण्याकरीता प्रभावी निगराणी करणे आवश्यक आहे. नमुद गुन्हेगारांच्या गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा बसावा याकरीता दिनांक १५/११/२०२१ पासुन प्रायोगिक तत्वावर

पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम
काटा रोड,सिव्हील लाईन,वाशिम, ता जि वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२–२३४८३४
ई–मेल sp.washim@mahapolice.gov.in
Website:-www.washimpolice.gov.in
****

**CRISP (Criminal Intensive Surveillance Program)** ची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. हा एक गुन्हेगारी नियंत्रण आणि पाळत ठेवणारा प्रकल्प असुन हयात आरोपीना निगराणीवर ठेवुन त्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवुन त्यांना दिवसा/रात्री

हया प्रणालीत ३ टप्प्यामध्ये आरोपी चेकिंग करण्यात आले बिट अंमलदार/ठाणेदार/स्थानिक गुन्हे शाखा. तसेच प्रणालीत आरोपीचे लाईव्ह फोटो ग्राफ घेऊन लॅट/लॉग घेऊन त्याना शोधणे सोपे जाते. CRISP मुळे पोलीस ठाणे हददीत रहाणारे आरोपीबददल माहिती मिळेल, एका क्लिकमध्ये आरोपीवर प्रलंबित आणि बंद प्रकरणाबाबत अदयावत माहिती मिळेल. एकाच पुस्तकात सर्व प्रकारच्या गुन्हेगारांची माहिती मिळेल आरोपींचे डॉसिअर अदयावत ठेवण्यास मदत होईल. प्रत्येक महिन्याच्या मासीक गुन्हे आढावा बैठकित हया बाबत आढावा घेण्यात येणार आहे. मागील ३ महिन्यात प्रायोगिक तत्वावर CRISP च्या माध्यमातुन जातीय गुन्हयातील ८१६ आरोपी चेकींग केले ७२५ हजर मिळाले, माहितगार गुन्हेगार २८४ आरोपी चेकींग केले १९७ हजर मिळाले. याचा दर आठवडयाला आढावा घेण्यात येतो.

**DRISHTI**:- तसेच नव्याने सुरु करण्यात आलेल्या **दृष्टी सर्वसमावेशक पोलीस पेट्रोलिंग प्रणाली** या यंत्रणेअंतर्गत वाशिम जिल्हयातील एकुण १३ पोलीस स्टेशन अंतर्गत ७८९ गाव कवर करण्यात आली असुन जिल्हयात एकुण ३७०० क्युआर कोड लावण्यात आले असुन ७८ वाहनांमध्ये जीपीएस यंत्रणा बसविण्यात आली आहे. यात पोस्टे हददीतील सर्व धार्मिक स्थळे संवेदनशिल मर्मस्थळे, बॅक,एटीएम,रेल्वे स्टेशन,सराफा लाईन सर्व शाळा विदयालय कॉलेज इत्यादी ठिकाणी पोलीस गस्त वाढविणे आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांवर लक्ष ठेवनु त्यांचे गुन्हेगारी कृत्यावर आळा बसावा तसेच सामन्य जनतेमध्ये पोलीसांचे अस्तित्व दिसनु जनतेमध्ये पोलीसांप्रति विश्वास निर्माण होवुन लोकांचे जिवित्वाचे आणि सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे करीता वाशिम जिल्हा पोलीस घटकात क्यु आर कोड आणि दृष्टी सर्व समावेशक पोलीस गस्त प्रणाली कार्यान्वीत करण्यात आली आहे.

**निर्भया** :– वाशिम जिल्हा पोलीस दलामध्ये निर्भया पथकाची स्थापना करण्यात आली असुन पुर्वी वाशिम शहरामध्ये मर्यादीत असलेल्या निर्भया पथकाची वाशिम जिल्हयातील १३ पोलीस स्टेशन मध्ये स्थापना करण्यात आली आहे.

**कायदा व सुव्यवस्था** :–१२ व १३ नोव्हेंबर रोजी त्रिपुरा राज्यामध्ये घडलेल्या घटने संबधाने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न कारंजा शहर येथे निर्माण झाला होता. सदरचा कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न वाशिम जिल्हा पोलीस दलाने कौशल्य पुर्णपणे हाताळुन कोणतीही जिवीत वा वित्ती हानी होवु दिली नाही.

**डायल ११२**:– जिल्हयातील नागरीकांना तात्काळ पोलीस मदत मिळावी म्हणुन डायल ११२ प्रणाली उपलब्ध आहे. सदर प्रणालीचा प्रतिसाद महाराष्ट्र हा तिस–या क्रमांकावर आहे. पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम येथे जेष्ठ नागरीक कक्ष स्थापन करण्यात आला असुन जेष्ठ नागरीकांचे अर्ज स्विकारून त्यावर तात्काळ कार्यवाही करण्यात येते.

**भरोसा सेल** :–तसेच भरोसा सेल च्या माध्यमातुन त्यांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. पोलीस काका योजने अंतर्गत पोलीस व विदयार्थी यांच्यातील सुसंवाद वाढवुन छेडछाड ,दादागिरी ,रॅगीग

पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम
काटा रोड,सिव्हील लाईन,वाशिम, ता जि वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२–२३४८३४
ई–मेल sp.washim@mahapolice.gov.in
Website:-www.washimpolice.gov.in
****

,अंमली पदार्थाची विक्री ,सायबर क्राईम अशा प्रकरणामध्ये विदयार्थाना मदत करून त्याच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण केली आहे.

मा.पोलीस महासंचालक, म.रा.मुंबई यांनी **वाशिम जिल्हा पोलीस दलाला बेस्ट वेलफेयर ॲक्टीव्हीटी म्हणुन सन्मानित करण्यात आले आहे**. तसेच मा.पोलीस अधिक्षक, वाशिम हे वेळोवेळी पोलीस कल्याणाकरीता दरबार घेवुन त्यांच्या अडचणीचे निरासरण करीत असतात.

सदर प्रसार माध्यमांशी संवाद साधताना मा. पोलीस अधिक्षक यांनी वाशिम जिल्हयात महिला करींता,जेष्ठ नागरीकांकरीता राबविण्यात येणाऱ्या वेगवेगळया उपाययोजनांची माहिती देऊन वेळोवेळी प्रसारित करण्यात येणारे टोल फ्री क्रमांक,नियंत्रण कक्ष महिला हेल्पलाईन,जेष्ठ नागरिक हेल्पलाईन तसेच कार्यालयाच्या अधिकृत संकेत स्थळावर संपर्क करुन विविध उपाय योजनांचा लाभ घेण्याबाबात सांगितले.

सदर कार्यक्रमास मा. पोलीस अधिक्षक बच्चन सिंह,अपर पोलीस अधिक्षक गोरख भामरे, सर्व शाखांचे प्रभारी अधिकारी तसेच वेगवेगळया प्रसाार माध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मा. पोलीस अधिक्षक यांनी सर्वाना नुतन वर्षाच्या शुभेच्छा देऊन कार्यक्रमाची सांगता केली.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय
वाशिम